
# गीत मल्हार

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४३९



REFBK-0023183
REFBK-0023183

-: कवी :-

कल्याण इनामदार





कल्याण इनामदार ! आजच्या मराठी काव्य प्रांतातील झपाट्याने पुढे येणारे व्यक्तीमत्व. आपल्या शैलीदार आणि खास ' कल्याणी ' शब्दानी वेगळेपण सिद्ध करणारे म्हणून ते सर्वपरिचित आहेत. साधी, सरळ पण तितकीच रसाळता त्यांच्या काव्यात आढळून येते. नाट्यलेखक म्हणून जितका लौकिक आहे तितकाच कवी म्हणून देखील. आजपर्यंत 'गीत गजानन' 'उद्यान गणेश गीता' हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले असून त्याचे सर्वांनी जितक्या उत्साहाने स्वागत केले तितकेच स्वागत त्यांच्या या तिसऱ्या काव्यसंग्रहाचे होईल अशी आशा आहे.

याखेरीज साई गीता, ब्रह्मचैतन्य गीता, आणि स्वामी समर्थ गीता हे त्यांचे आगामी काव्यसंग्रह आहेत

विठ्ठल शिंदे ! संगीत क्षेत्रातील अग्रगण्य नाव, अतिशय परिश्रमपूर्वक कलासाधनेने आज साऱ्यांच्या आवडीचे झालेले संगीत दिग्दर्शक तसेच गायक म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहेत. त्यांची अनेक गीते आज अबाल-वृद्धांच्या तोंडी घोळत आहेत. त्याशिवाय रेडिओ, टी. व्ही. वर होत आहेत. त्यांनी 'गीत मल्हार' मधील अनेक गीतांना रसाळ तितक्याच सुमधूर चाली दिल्या आहेत, त्याही लोकप्रिय होत आहेत

त्यांच्या सुरेल आवाजातून 'गीत मल्हार' चा कार्यक्रम आकाशवाणीच्या मुंबई केंद्राने १९ एप्रिल १९८० रोजी सादर केला तो रसिकांना अत्यंत आवडला. अनेक श्रोत्यांकडून हे पुस्तक रुपाने प्रसिद्ध व्हावे अशी इच्छा प्रदर्शित केल्यामुळेच श्रद्धा प्रकाशनाने ते प्रसिद्ध केले आहे.

श्री कल्याण इनामदार यांचे भाव व विठ्ठल शिंदे यांचे सुरेल सूर जनमनात गुंजून उठतील.

# गीत मल्हार

REFBK-0023183
REFBK-0023183

: कवी :

कल्याण इनामदार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

श्रद्धा प्रकाशन
दादर, मुंबई ४०००२८

© श्री. कल्याण इनामदार
सर्व हक्क कवीचे स्वाधीन

प्रथमावृत्ती
१-५-१९८०
महाराष्ट्र दिन

मूल्य २ रुपये

मुखपृष्ठ :
चित्रकार श्री. कमलाकर गोंजी

मुद्रक :
आर. के. घरत
अंजली प्रिन्टर्स, अलिबाग-कुलाबा

प्रकाशिका :
सौ. श्रद्धा इनामदार
द्वारा श्रद्धा प्रकाशन
२/३५ इलम महाल
रा. ब. सी. के. बोले रोड,
दादर, मुंबई ४०० ०२८

तीर्थस्वरूप भाईमामा उर्फ
लक्ष्मण महादेव परुळेकर
यांच्या स्मृतीस–

# मनोगत

नमस्कार !

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विखुरलेल्या माझ्या अठरापगड आदरणीय खंडोबा भक्तांना विनम्र अभिवादन करून, मी माझे ' गीत मल्हार ' त्यांच्या सेवेला सादर करीत आहे.

भक्ती मार्गावर टाकलेले हे माझे तिसरे पाऊल. ते टाकत असतांना ज्यांनी ज्यांनी मला आपल्या सहकार्याचे बळ दिले त्या सर्वांचे शुभाशीर्वाद घेऊन मी पुढची वाटचाल करणार आहे.

पालीचा खंडोबा व औंधची यमाई ही माझी कुल-दैवते. त्यांच्यावर विश्वास ठेवून जीवनातील प्रत्येक संक-टाला सहर्ष सामोऱ्या जाणाऱ्या स्वर्गीय मातापित्यांच्या शिकवणीतूनच या ' गीत मल्हारची ' बीजे अंकुरीत झालेली आहेत. त्यांच्यावर संस्काराचे खतपाणी करणाऱ्या माझ्या गुरुबंधु भगिनींना साष्टांग नमस्कार करुन मी खंडेरायाला प्रार्थना करतो–

येळकोट येळकोट द्यावे  
देवा नवकोट नारायणा ।  
आम्ही गाऊ तुझी आरती  
पुरवी आमुची मन:कामना ।।

श्रीराम नवमी  
२४।३।८०

–कल्याण इनामदार

# मित्र – ऋण

श्री. कल्याण इनामदार हे एक कलावंत आहेत. तसेच श्रद्धाळू नि भावनाप्रधान गृहस्थही आहेत. त्यामुळे त्यांच्या कलेचा नि मनाचा कल केव्हा कोणीकडे झुकेल ते सांगणे कठीणच आहे. तथापि त्याला श्रद्धेचे अधिष्ठान नि संस्कृतीचे कोंदण असल्यामुळे लोकनाटयाकडून ते वळले ते भक्तिमार्गाकडेच, त्यांचे 'गीत गजानन' ही त्याची पावती आहे आणि आता त्यांनी पुढचे पाऊल उचलले आहे ते खंडोबाच्या वर्णनाचे, खंडोबा, मग तो जेजुरीचा असो नाहीतर पालीचा असो, ते एक लोकदैवतच म्हणून मानण्यात येते. तेंव्हा त्यांची भक्तिगीतें किंवा महात्म्यवर्णन हेही लोकगीतात सामाविष्ट करण्यास काहीच प्रत्यवाय नसावा. ज्या क्षेत्रात श्री इनामदार पदार्पण करतात, त्यात त्यांची कलाकृती पदार्पण करते, त्यात ते संपूर्णतया समरस होतातच, पण त्यावर आपला ठसाही उमटवितात.

वास्तविक पाहाता आजचा काळ हा विज्ञानाचा, त्यात भक्तिमार्गाला फारसा वाव नाही, स्थानही नाही असे म्हणू या फार तर. तथापि देशभक्ती ही एक प्रकारची भक्तीच असली तरी विज्ञान युगात ती विसंगत किंवा टाकाऊ मानलेली नाही. त्यामुळे देवभक्ती आणि देशभक्ती यात विभेद मानण्याचे मला तरी काही कारण दिसत नाही. देश दिसतो ती माणसे, पशुपक्षी निसर्ग, यांनी गजबजलेला असतो, तसा देव कांही दिसत नाही असा युक्तिवाद यावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि हा ज्याच्या त्याच्या दृष्टीचा नि भावनेचा प्रश्न आहे असे मी म्हणेन. प्रख्यात मराठी नाटककार आणि कवी गोविंदाग्रज यानीच एके ठिकाणी या संबंधात असे म्हटलेले आहे की,

'भाव ज्या टाकी,
देवातुनी,
दगडच बाकी राहतो –'

एकाच दगडात मूर्तिकाराला मूर्तिमंत सौंदर्य दिसेल तर सामान्य माणसाला नुसता पायरीचा दगडच दिसेल. या जगांत देव नाहीच असे जर नवयुगाचे किंवा विज्ञानयुगाचे प्रामाणिक मत असेल तर मध्यंतरी रशियन कृत्रिम उपग्रह आकाशांत अधांतरीच बिघडले असताना त्यातील संशोधक सुखरुप खाली यावेत यासाठी अगदी त्या साम्यवादी रशियापासूनच अवघ्या जगाने ज्या सामुदायिक नि प्रकट अशा प्रार्थना केल्या त्या कोणाच्या हो? त्या यानाच्या की विज्ञानाच्या? म्हणजे काहींना केवळ संकट काळीच काय तो जो आठवतो तो देव, परमेश्वर! तो इतरांचा नित्य भक्तिचा ठेवा असतो इतकेच काय ते? त्या भक्तित कोणाची किती समरसता दिसून येतें त्यावर त्याची उंची ठरत असते. मग ते युग कोणतेही असो आणि म्हणूनच या नव्या युगात–विज्ञान युगात वावरणाऱ्या श्री. इनामदार यांनी स्वीकारलेली भूमिका ही अशी निश्चित असल्यामुळं खंडेरायाचे 'गीत महात्म्य' गाताना ते त्या दैवताशी तन्मय होताना आढळतात. साहित्यातील सौंदर्याची पाखरण किंवा प्रतिभाविलास न आढळला तरी श्रद्धेची फुले त्यात निश्चित आढळतात. म्हाळसाकांताचा धावा करताना ते म्हणतात ..

'तुझ्या कृपेने पावन व्हावी
माझी जीवन गाथा
ये रे धावत माझ्यासाठी
सदा म्हाळसा कांता ।।

म्हणजे म्हाळसाकांताकडे ते निवडणुकीची दर्शिका, निवडणुकीतील यश किंवा मंत्रीपद मागत नाहीत तर म्हाळसाकांताचे दर्शनच काय ते! त्याच्या दर्शनाने आपली जीवनगाथा तुकारामादी संताप्रमाणे पावन होऊन जाईल ही त्यांची भावना, श्रद्धा, तर ज्या खंडेरायावर त्यांचा पूर्ण भरवंसा आहे त्याने दर्शन दिलेच तर आणि प्रसन्न होऊन त्याने वर माग असे म्हटलेच तर त्याच्याकडून काय मागावे हे ही त्यांनी अगदी निःसंकोचपणें ठरवून ठेवलेले आहे ते म्हणतात–

‘ निर्वाणीचा इचार करुनी आलो पाल–पेंबरी
जिनगानीचा बेलभंडार अर्पण पायावरी
काय मागावं मला कळेना पंचाईत ही खरी
मनात माझ्या सदा राहावी तुझीच रे स्वारी ’

अशीच इच्छा ते व्यक्त करतात. ही महाराष्ट्राच्या इतिहासातील भक्तीसंप्रदायाची प्रभा नि परंपरा आहे. विज्ञान युगात वावरणाऱ्या श्री. इनामदारांना आपले नातं तिच्याशी जोडावयाचे असल्याने तें लोकनाटचाकडून भक्तीमार्गाकडे वळले.

खंडोबा काय, बहिरोबा काय, ज्योतिबा काय नि विठोबा काय ही सारी रुपे आहेत ती एकाच ब्रह्माची. निरनिराळचा काळी जसजशी आवश्यकता भासली तसतशा भूमिका वठविण्यासाठी भेटलेली ही सर्व रुपे आहेत. आज मानवतेची महती गात असतांनाही ज्या राक्षसी प्रवृत्ति त्या मानवतेच्या मानभावी आवरणाखालून सैतानी तांडव करताना आढळतात तशाच वृत्ती प्रवृत्ती आणि शक्तिही प्राचीन काळी सुद्धा सर्वत्र धूडगूस घालीत. त्यांचा निःपात करण्याकरिता सुजन संरक्षण नि दुर्जन संहारासाठी देवांना अवतार घ्यावे लागत असे आपले प्राचीन संस्कृत साहित्य सांगते. खंडोबा त्याला अपवाद नाही.

जेजूरीच्या खंडोबाच्या यात्रेचेही वर्णन समर्थ रामदासानी केलेले आढळते. त्यात हिंदूधर्म, हिन्दू संस्कृति नि हिन्दुराष्ट्र द्वेष्टचा औरंगजेब या परकी आक्रमकाला भोंग्यांच्या सैन्याच्या हल्ल्याने कसे परतविले याचे वर्णन आजही वाचण्यासारखे उद्‌बोधक आहे, म्हणजे आमची दैवते केवळ कटेवरी हात, विटेवरी उभे अशीच नसून दुर्जन संहाराचे सामर्थ्य असणारी शंख-चक्र-गदा इत्यादी अयुधेधारक अशीही आहेत. आक्रमणांचा प्रतिकार हाच त्यांचा संदेश आढळतो. त्याचीही कांही शद्बचित्रे श्री. इनामदार यांनी आपल्या या खंडोबा गीत महात्म्यात चितार ह्यास त्यात विविधता येईल असे मला वाटते.

लौकिक दृष्टचा खंडोबा हा वीरपुरुष होता. स्वतःच्या कर्तबगारीने त्याला दैवतरुप प्राप्त झाले असे संत एकनाथ म्हणतात.

कानडाऊ विठ्ठलाप्रमाणेच मैराळ हे खंडोबाचे कानडी नाव आहे. श्री. इनामदार यांनी या दोन्ही रुपावर कवने असली तरी मूळ प्रतिभा-आत्मा एकच आहे हे अधिक स्पष्ट व्हावे असे वाटते. भक्तगणांसाठी धाऊन जाणाऱ्या अडल्या नडलेल्या प्रसंगी सहाय्य करणाऱ्या या दैवतांची रुद्र रुपे आढळतात.

समाजाच्या दृष्टीने त्यांच्या महात्म्याच्या नि भक्ती मार्गाचा उपयोग व्हावयाचा तर आजच्या परिस्थितीत त्यांच्या रौद्ररुपातील दर्शनाची नितांत आवश्यकता आहे असे मला वाटते खंडोबाला दहा वा रूद्र असेही म्हटलेले आहे, ते त्याचे रुप आपल्या वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न श्री. इनामदार यांनी केल्यास तो स्वागतार्ह ठरेल असे मला वाटते. ज्या कार्यासाठी खंडोबा हा अवतार झाला त्याचे वर्णन मल्हारी महात्म्यात आहे. मणिमल्ल नाशासाठी शंकराने हा अवतार घेतला त्याचे वर्णन गीत खंडेराय पूर्ण होण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे असे मला वाटते. श्री. इनामदार यांनी खंडेरायाचा पोवाडा गाईला आहे. मुरळी नाचवली आहे, गोंधळही घातला आहे. पण डमरु मात्र वाजविला नाही. शंख फुंकलेला नाही, शूळ खणखण-विलेला नाही, यामुळे ते वर्णन अपुरे वाटते ते पूर्ण करण्यासाठी किंवा ते पूर्ण करण्या इतकी भक्ती, निष्ठा नि सामर्थ्य श्री. इनामदार यांच्या पाशी आहे असा मला विश्वास वाटतो.

शेवटी श्री. कल्याण इनामदार यांनी स्वीकारलेल्या या नवीन जीवन-मार्गात त्यांना संपूर्ण सुयश चिंतून हे माझे लांबत चाललेले दोन शद्व मी इथेच आवरते घेतो. कारण मला प्रामाणिकपणे असे वाटते की हा अधिकार माझा नाही, पण केवळ मित्रकर्तव्य म्हणूनच हे दोन शब्द लिहिण्याचे मान्य करुन आज त्या मित्र ऋणातून मी मुक्त होत आहे.

अक्षय्य तृतीया
शके– १९०२ **अप्पा कासार**
१७।४।८०

# दोन शब्द

लोकनाटयातून भक्तिमार्गाकडे वळलेल्या कवी कल्याण इनामदार यांच्या ‘ उद्यान गणेश गीता ’ व ‘ गीतगजानन ’ या पुस्तकांच्या निर्मितीनंतर चार महिन्यातच त्यांच्या ‘ गीत मल्हार’ या पुस्तकाला दोन शब्द लिहिण्याची वेळ येईल असे वाटले नव्हते.

लोकनाटयातील त्यांची प्रगती ज्या गतीने झाली त्यामानाने या भक्तिमार्गाने अल्पावधीतच साहित्यनिर्मितीला जो वेग आला आहे त्याचे कारण म्हणजे या मार्गावरील त्यांची श्रद्धा व निष्ठा पराकोटीला पोहोचलेली आहे असेच म्हणावे लागेल.

खंडोबा, बहिरोबा, ज्योतिबा नि विठोबा ही सारी एकाच ब्रह्माची, खेडयापाडयात निरनिराळया ठिकाणी विखुरलेली ही दैवते म्हणे भक्तजनासाठी धावून जाणाऱ्या, अडल्या-नडल्याप्रसंगी सहाय्य करणाऱ्या या दैवतांची ही रौद्ररुपे आहेत.

या दैवतावर कल्याण इनामदारांची जन्मजात भक्ति असून महाराष्ट्राच्या या दैवतांच्या परिसरातील ग्रामीण भाषेचे ज्ञानही कल्याण इनामदारांच्या शद्बाशद्बातून प्रगट होते व प्रत्येंकाची या दैवता बद्दलची आपुलकी वाढीला लागते. भाव व भाषा यानी कल्याण इनामदार ‘ गीत मल्हार’ मुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण घराघरात प्रवेश करुन मानाचे स्थान प्राप्त करुन घेतील असा विश्वास ‘ गीत मल्हार ’ मुळे मला वाटतो.

**सुधाकर सामंत**
संपादक, भक्तिसंगम

# सांब सदाशिव

## (आरती)

मणिमल्ल मारुनि अमर जाहला, देव मल्हारी
एक मुखाने गाऊ आरती हा सकल दुःखहारी

करून देऊळ, या देहाचे होऊ सारे ऋणी
विश्वंभर हा आज पाहुया हृदय–सिंहासनी
पंचप्राण हे तेवत राहतील नयनी निरांजनी
मनास मानून बेलभंडारा अर्पुयारे झणी ॥१॥

विसरून जाऊ तुझ्या–माझ्याचे अनंत देव्हारे
विसरून जातील घराघरांतील स्वार्थाचे वारे
दे दे आम्हा अजून काही हीच मागणी का रे ?
प्रसन्न होता कुलदैवत हे भक्ती मागू या रे ॥२॥

हा सांब सदाशिव सदा धावतो भक्तांच्या पाठी
पदोपदी परि घेई परिक्षा खऱ्या भक्तीसाठी
देण्या आधी सर्व मागतो गोष्ट नसे खोटी
मुक्त होऊ, सारे या, घ्या जीवा शिवाच्या भेटी ॥३॥

# येळकोट

येळकोट येळकोट घ्यावे
देवा, नवकोट नारायणा
आम्ही गाऊ तुझी आरती
आमुची पुरवी मनःकामना ।।१।।

मंदिरी आलो तुझ्या मल्हारी
घेऊन बेल भंडार दवणा
त्रिवार वंदन तुला करूनी
अर्पितो श्रद्धा तव चरणा ।।२।।

डिम् डिम् डिम् डिमडी बोलली
ये ना ग घाटी साथीला
हुरुप येता नाचे मुरळी
वाघ्या गातसे तव कवना ।।३।।

अखंड जागर तव नामाचा
देवीचा चालला गोंधळ
दिव्य दिवटीला पोत भेटला
आशिर्वाद द्या नारायणा ।।४।।

# म्हाळसाकांत

तुझ्या कृपेने पावन व्हावी
माझी जीवन गाथा
येरे धावत माझ्यासाठी
सदा म्हाळसाकांता ॥१॥

अज्ञजीव मी तुझे लेकरु
दाव मार्ग तू आता
भवसागर मज भीती दावितो
काय करु मी आता ? ॥२॥

षड्‌रिपू माझे सगे सोयरे
रजतम मम साथीला
भ्रमित मती मी आज जाहलो
काय गाऊ मी आता ? ॥३॥

मज दाव वाट तू मोक्षाची
तव चरणी धावत येण्याची
हो रजकण मी तव चरणाचा
तू पावन करि रे मज आता ॥४॥

# मैराळेश्वर

ब्रह्मांडाचा भार वाहतो
जो सदा सर्वकाळ
कुलदैवत ते आहे माझे
महादेव मैराळ
बोल भक्ता येळकोट बोल ॥१॥

ब्रह्मांड पुराणी कथा कथन
हे, व्यासानी केले
रक्षण करूनी धर्मसुतांचे
अमरत्व सिध्द झाले
बोल भक्ता येळकोट बोल ॥२॥

ब्रह्म जाहले सदेह येथे
बघ अश्वावर स्वार
मर्दन करण्या मणिमल्लाचे
करी म्हाळसा वार
ब.ल भक्ता येळकोट ब.ल ॥३॥

ब्रह्मरूप मी व्हावे देवा
हा मनी असे भाव
अस्तित्वाचा विसर पडावा
ना उरो नाव गांव
बोल भक्ता येळकोट बोल ॥४॥

# शंकरगौराई

सप्तकोट हे खडा पहारा नित्य जिथे देती
दर्शन घेण्या मल्हरीचे भक्त तिथे येती
पावन झाली पदस्पर्शाने भक्तिण पालाई
स्वयंभूरुपे प्रकट जाहले शंकरगौराई ॥१॥

वांझ गाईला फुटला पान्हा वाळवंटावरी
दृष्टांतावी साक्ष भेटली मृत्यूलोकावरी
दूर सारता दूधाळ वाळू देव आले वरी
शिवलिंगाचे ध्यान सावळे शंकरगौराई ॥२॥

चंपाषष्ठी जन्म दिवस हा ठरला भूवर
भक्तगणांनी तिथे बांधले मंदिर मैराळ
तीर्थक्षेत्र हे प्रसिद्ध झाले पाल नि पेंबरी
पौषमृगी मग लग्न करीती शंकरगौराई ॥३॥

कुलदैवत हे महाराष्ट्राचे माझे माहेर
सदानंदमय अखंड दिसते सदा प्रेमपूर
वाघ्यामुरळी भक्तगणांसह जागती जागरी
अज्ञानेश्वर करि हा पावन शंकरगौराई ॥४॥

# खंडेराय

तुझ्या वाचूनी कुणी न्हायरं मला खंडेराया
आभाळ फाटलं चारी बाजूनी करि आता छाया

पैं-पैक्याची आज नाही रं गाठोड्यात माया
तोंड मिळवनी, हात-तोंडाची थकवी ही काया
घडो घडीला टाकून बोलते घरामध्ये जाया
धावपळ गेली आज वाटतं सारीच रे वाया ॥१॥

येडा बागडा मी रं देवा सरळसोट मानूस
पाप-पुण्याचा हिशेब करता मला लागलं पीसं
दिसरातीला म्हनू लागला आज उद्याच कसं ?
माझं मन परि मला सांगतं तुझ्या इस्वासावर बस ॥२॥

निर्वानीचा इचार करुनी आलो पालपेंबरी
जिनगानीचा बेलभंडार अर्पन पायावरी
काय मागावं मला कळेना पंचाईत ही खरी
मनामध्ये माझ्या सदा रहावी तुझीच रं स्वारी ॥३॥

# पालीचा खंडोबा

बारा बलुती अठरा जाती
जिथं जाती थेट
बा, बानुपति सांबसदाशिव
तिथे मला भेट
येळकोट येळकोट जयमल्हार
चला वाहू त्यास बेलभंडार ॥१॥

ऐल तिरावर पैल तिरावर
पाल आणि पेंबर
जलधर कन्या मध्ये धावते
तारळा सुंदर
येळकोट येळकोट जयमल्हार
चला वाहू त्यास बेलभंडार ॥२॥

सह्यगिरीच्या उशा पायश्या
पालीचा परिसर
विंध्यवासिनी पाठराखिण
उभी पश्चिमेवर
येळकोट येळकोट जयमल्हार
चला वाहू त्यास बेलभंडार ॥३॥

राहुडचाची शीव दाखवी
लक्ष्मणाची रेषा
उत्तरटाकी लिही सटवाई
लल्लाटाची भाषा

यळकोट येळकोट जयमल्हार
चला वाहू त्यास बेलभंडार ॥४॥

उगवतीस समनामिर डोंगर
कुशीत त्याच्या दिसतो शंकर
शंभोवळ- चोडघळ मुळ घर
वडगांव- शिरगांव शूर वीर
येळकोट येळकोट जयमल्हार
चला वाहू त्यास बेलभंडार ॥ ५ ॥

चोंर मरळीची शीव दाखवी
समर्था, आनंदवनाची वाट
सप्तकोट हे आज घूमवती
देवा येळकोट येळकोट
येळकोट येळकोट जयमल्हार
चला वाहू त्यास बेलभंडार ॥ ६ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
23963
दा. क्र. 2739
मधल
काव्य
ग्रंथ शाखा प्रत

# मलूखान

अनंत रूपे तुझी अनंता
अंतरी या येती
तुला पाहता मला मिळावी
सांब सदाशिव मूर्ती ॥ १ ॥

जागरणे मी बहूत केली
परि जाग ना आली
उधळून भंडार तुझ्यावरी
अखेर हात खाली ॥ २ ॥

भरित रोडगा तुला आवडे
म्हणूनच मी खाई
भंडाऱ्याचा प्रसाद सरतो
सदैव घरच्या घरी ॥ ३ ॥

नित्य मंदिरी होते फेरी
परिमन विषयावरी
मायेचा हा लंगर माझा
तूच तोड मल्हारी ॥ ४ ॥

तू येळकोट येळकोट दे
मज मुक्तिची वारी
मल्लूखाना तुझ्या वाचुनी
मज कोण कैवारी ॥ ५ ॥

# मार्तंड भैरव

दाही दिशांनी धावत आल्या
मजवर संकटराशी
बानूपती मार्तंड भैरवा
मी जावू कुणापाशी ।। १ ।।

कालगतिच्या कालपटावर
काळोखाच्या राशी
बघ पाऊले मार्ग शोधती
तुला भेटण्यासाठी ।। २ ।।

प्रारब्ध पोरके पाठी आले
येताना सांगाती
संचित गेले सर्व संपूनी
सुखं वेचण्यासाठी ।। ३ ।।

मन व्याकूळ हे मुक्तीसाठी
नसे पुण्य परिगाठी
साद धावती मुकी आसवे
तुला पाहण्यासाठी ।। ४ ।।

# भरीत रोडगा

नित्यस्मरण हो ओठावरती
हेच तुला मागतो
बिल्वपत्र मम जीवन करूनी
चरणावर अर्पितो ॥१॥

व्हावा जागर गोंधळ सरूनी
नवस तुला बोलतो
मायबाप म्हाळसा मल्हारी
साद तुम्हा घालतो ॥२॥

तू माझे मी पण होऊनी
का न मार्ग दावितो ?
भरीत रोडगा प्रसाद करुनी
नैवेद्य भरवितो ॥३॥

देही मंदिरी तू वास करी
हा हट्ट मनी धरितो
स्वयंभू रूपे तुला पाहुनी
धन्य कुडी करी तो ॥४॥

# म्हाळसामाता

चला उठा रे नाचू बागडू आनंदे आता
माय माऊली मला पावली म्हाळसामाता

बघ दुःख संपले पाप पळाले ना उरे चिंता
एकमुखाने आज गाऊया आरती आता
कुणी न राहो दीन भिकारी याचक हो आता
खिरापतीला वाटू गरिबी संतोषे आता ।।१।।

होम कुंड हे आज पेटले एकीचे आता
स्वार्थ सारे पळून जातील आज पाताळा
नका पाहू रे जात धर्म अन् पंथ तो आता
एका आईची व्हा लेकरं सुखी रहा आता ।।२।।

वसा घेऊनी मानवतेचा कर्म करा आता
हेवा वाटेल बघा स्वर्गाला पाहुनी तुम्हाला
धन्य होऊया मानवदेही भूवरी आता
पहा साथीला आज धावली म्हाळसामाता ।।३।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# बाणाई

ये आई बाणाई ये ग
मार्ग भक्तिचा आम्हाला दाऊन जाग

कथा तुम्ही आज ऐका हो
माझ्या बाणाई आईची
धनगर कन्या कशी जाहली
अस्तुरी म्हाळसाकांताची ॥१॥

दोन भार्या भोळ्या शंकरा
सवती सवती गंगा गौरा
चालू सवत मत्सर सदा घरा
भांडण सोडवी दासी जया ॥२॥

खुष होऊन गंगा गौरा
अर्पी जयाला सवतपणा
जया जन्मली बानू रूपे
मल्हारी चाकर तिच्या वरा ॥३॥

दोघं रानी वनी डोंगरी
पाळी मेंढरं बरोबरी
महिपती राजा गंमत करी
ठेवी मेंढरं सोलून सारी ॥ ४ ॥

ही होती तशी कर मेंढर
का मरू सांग मी तुज म्होरं
होती तशी करीन मेंढरं
कर लगीन माझ्या बरोबर ॥ ५ ॥

उमजे बाणाई सत्वर
देई देवाला होकार
होई अमर ‘जया’ खरोखर
यावी जाग आम्हा लवकर ॥ ६ ॥

# वाघ्या मुरळी

तो– नाचनाचून मुरका मारी
बघा माझ्या मल्हारीची मुरळी

ती– वाट अडवून वाघ्या दादा
काढी लई खोटी खोटी कुरळी

तो– तू तर वाऱ्यावरी जशी स्वार
नको शब्दांचा भडीमार
कथा असे ही गहन फार
हक्काचा मी भरतार
कशी न्हाई तुला ती कळली

ती– छुन् छुन् छुन् छुन् वाजता नूपूर
देई हा डीमडीवर जोर
नको मनामधी कुरकुर
वाढली वाघ्याची हुरहुर
बघ वाघ्याला हुडहुडी भरली

तो– जरी मेंढपाळ धनगर
आहे त्रिखंड माझं घर
मीच मल्हारी मीच शंकर
मला ओळख ग लवकर
तुला मनानं हाय मी वरली

ती– आलं ध्यानात रूप तुझं न्यारं
तुझी म्हाळसा मीच बानू रं
माझा भरतार गौरहर
सात जन्माचा जोडदार
तुझी माझी जोडी रं आता जमली

# खंडोबाचा पोवाडा

पहिलं नमन विघ्नहर्त्याला
मंगल मूर्ति गणरायाला
ओंकाररूपी गौरीनंदनाला
करतो आता रं जी जी जी ।। १ ।।

दुसरं नमन महाराष्ट्राला
मराठ मोळ्या मर्दमुलखाला
सह्याद्रिच्या जेजूर पठाराला
करतो आता रं जी जी जी ।। २ ।।

आता नमन खंडेरायाला
म्हाळसापती मलूखानाला
बाणाईच्या धनगर देवाला
करतो आता रं जी जी जी ।। ३ ।।

शांतचित्त द्वारे सावधान
कथा तुम्हा सांगतो छान
लई अपरूख मल्हार पुराण
जी जी जी ।। ४।।

एके काळी पृथ्वी तलावर
दोन दैत्य होते महाक्रूर
एक मणि दुसरा मल्हासूर
जी जी जी ।। ५ ।।

मदनमस्त निर्दय निष्ठूर
नित्य करती अन्याय अत्याचार
जळी स्थळी माजला हाहाःकार
जी जी जी ॥ ६ ॥

भयभीत झाले नरहारी
ऋषीमूनी चितातूर भारी
नाही राहीला कुणी कैवारी
जी जी जी ॥ ७ ॥

सारे मिळुन गेले वैकुंठासी
साकडे घालती विष्णू देवाशी
विष्णू म्हणे भजा शंकराशी
जी जी जी ॥ ८ ॥

वंदन केले जाऊन शंकराला
सारा कथा भाग कानी घतला
शंभा आले भक्ताच्या मदतीला
जी जी जी ॥ ९ ॥

देव झाले अश्वावर स्वार
बरोबर घेती म्हाळसानार
चाल करून गेले दैत्त्यावर
जी जी जी ॥ १० ॥

युद्ध सुरू झाले घनघोर
मणि केला आडवा धरणीवर
मल्ल धावून आला दोघावर
जी जी जी ॥ ११ ॥

मार्तंड भैरव कोपला फार
आणला शरण मल्ल पायावर
हात जोडूनीं प्रार्थी शंकर
जी जी जी ॥ १२ ॥

प्रसन्न होता म्हणे शंकराला
मागणे तुझ्या एक पायाला
नाव जोडावे तुझ्या नावाला
जी जी जी ॥ १३ ॥

देव मग तथास्तु बोलला
मार्तंड भैरव मल्हारी झाला
जेजूर पठारी राही मुक्कामाला
जी जी जी ॥ १४ ॥

# गोंधळ

आई उदे ग यमाई उदे
भोळ्या भक्ता यश लाभु दे

वाजला एकीचा संबळ
घालण्या आईचा गोंधळ
तुण तुण्या तालावरती पळ
करा या पोताला अवखळ
धाव–पाव आई जगदंबे ॥ १ ॥

घातला गोंधळाचा घाट
सोड तू सत्वर मूळपीठ
पाही, हा चौळ तुझी वाट
द्यावी, तू भक्ताला भेट
धाव पाव आई जगदंबे ॥ २ ॥

चौक हा चौरंगी सजला
भक्तांनी मळवट हा भरला
दिस आज भाग्याचा ठरला
औंध आलंय भक्ता धरला
धाव पाव आई जगदंबे ॥ ३ ॥

# जागर

भूलोकी वैकूंठ माझ पालपेंबर
गौरी शंकर झालं म्हाळसामल्हार

पोरठोरं जमा जाहली इथं खंडीभर
पै–पावन्यानी भरून गेल भक्ताच घर
सरस्वतीसह गौरीनंदन आले सत्वर
गुरुकृपेने आज घलतो भक्त जागर ॥ १ ॥

यजमानान पहा सजविला चौकसुंदर
जाळ भोळचा बुदल्या तू रं तेल भराभर
कार, मुरळी वरि येडचा तुझा लई भार
या हो म्हाळसाकांतां जोडीनं लवकर ॥ २ ॥

हाक मारुनी जागे करा पालपेंबर
सदा देवावरि उधळा भंडारा खोबर
सदानदमय होईल मग भक्तांच घर
यळकोट बोला मलूचा करूया गजर ॥ ३ ॥

हार्दिक शुभेच्छा

मनमौजी मुंबईकरांना मनपसंत
वेष भूषेच्या निवडीचे एकमेव स्थान

# बाबुभाई भवानजी

दादर टी. टी. सर्कल, टिळक ब्रीज नाका,
मुंबई–४०००१४. फोन : ४४१०२७

जे आज आहे ते उद्या नाही...

असा अत्याधुनिक प्रकारच्या कापडाचा अजब खजिना

हार्दिक शुभेच्छा

श्री. खंडोबाच्या चरणी नम्र प्रणाम

# सामंत ब्रदर्स

लोणी, तुपाचे व्यापारी

दादर, मुंबई नं. ४०००२८.

हार्दिक शुभेच्छा

ॐ

# विवेकानंद क्लासेस

स्थापना : १९७० दूरध्वनी ४५७०३८
४६७१३४

'गीत मल्हार'
या काव्य पुष्पास आदरयुक्त शुभेच्छा

मे. विवेकानंद क्लासेस
दादर–परळ–ठाणे

हार्दिक शुभेच्छा

## भाग्योदय मंगल सर्व्हीस

### कॅटरींग कॉन्ट्रॅक्टर्स

लग्न, मौंजी व इतर समारंभासाठी मेहताना पद्धतीने कामे स्वीकारली जातील.

८/९ लक्ष्मी निवास,
राम मारुती रोड,
दादर, मुंबई–२८

टें. नं. ४६ २८ ३७
वेळ : सकाळी ८ ते ११
सायंकाळी ४ ते ८

हार्दिक शुभेच्छा

## शाहाडे आठवले प्रायव्हेट लिमिटेड

शाहाडे बिल्डिंग
न. चि. केळकर रोड
दादर, मुंबई ४०० ०२८
टेलिफोन : ४५ ४५ ५४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
23903
दा. क्र. 2739
काव्य

हार्दिक शुभेच्छा

## गाजेंगी ब्रदर्स मेडीकल स्टोअर्स

दुकान नं. १, पत्रा चाळ, बी. डी. डी.
चाळ नं. १११ समोर, शिवराम एस. अमृतवार मार्ग,
मुंबई–४०००१३

आमच्या येथे सर्व प्रकारची औषधे योग्य भावाने मिळतील.

**एक वेळ अवश्य भेट देऊन खात्री करा.**

प्रो. एन्. आर. गाजेंगी ॲन्ड ब्रदर्स

हार्दिक शुभेच्छा

## 'ज्युलीएट प्रॉडक्टस्'

**ब्रेसीअर्स व अंडरवेअर्सचे उत्पादक**

मकवाना बिल्डींग क्र–३
काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई–४०००२५

REFBK-0023183

हार्दिक शुभेच्छा

**दादर विभागातील भव्य शो-रुम**

# सुआग

**मॅन्यु-ऑप्टिशियन्स्**  **प्रोप्रा. एस्. एम्. गावडे**

आधुनिक चष्मे, गॉगल्स, फरेमस्, मॅग्नीफाईंग लेन्सीस,
स्वीमींग गॉगल्स, रायडींग गॉगल्स, कॉन्टॅक्ट लेन्सीस साठी

एक वेळ अवश्य भेट द्या-

**नेत्र तज्ञांकडून डोळे मोफत तपासले जातील**

वेळ- सकाळ १० ते १२
संध्याकाळ ४ ते ८

'सरस्वती महाल'
गोखले रोड-रानडे रोड जंक्शन
दादर, मुंबई ४०००२८.

हार्दिक शुभेच्छा

- **पीपल्स स्टील एम्पोरियम**
- **प्रेशर कुकर्स**
- **ग्राइंडर-मिक्सर**

**व**

**सर्व गृहोपयोगी अद्यावत स्टेनलेस स्टीलची भांडी**

**व**

**मनपसंत इलेक्ट्रीकल शुभेच्छा भेटवस्तू**

**पीपल्स स्टील एम्पोरियम**

आर. के. बिल्डींग, गोखले रोड जंक्शन, दादर, मुंबई-४०० ०२८

हार्दिक शुभेच्छा

आधुनिक व खात्रीच्या सुवर्णालंकारासाठी

**एस्. जी. मालडीकर ॲण्ड सन्स्**

सोने चांदी व मोत्याच्या
दागिन्यांचे व्यापारी.

१६, गणेश भुवन,

गोखले मार्ग दक्षिण.
प्रभादेवी मुं. नं. २५



हार्दिक शुभेच्छा

सोमेश्वर प्रसन्न

# पांडुरंग हरी वैद्य

ज्युवेलर्स

सोने, चांदी, जव्हेरातचे व्यापारी

९, देव्हारे बिल्डिंग,
भवानी शंकर रोड,
राममंदिरा समोर,
दादर, मुंबई ४०००२८

हार्दिक शुभेच्छा

# पाठारे जिमको

**ह्या आधुनिक व्यायाम शाळेत**
**आपण नांव दाखल कराच कारण–**




- वैयक्तिक लक्ष
- अनुभवी व प्रशिक्षित शिक्षक
- आधुनिक साधनांनी सुसज्ज आणि प्रशस्त व्यायाम शाळा
- सर्वांना सोयिस्कर वेळा
- प्रत्येकाला परवडेल अशी माफक फी
- मसाजाची उत्कृष्ट सोय

**प्रो. पाठारे ब्रदर्स**

नावलकर बिल्डींग, कोहिनूर मिल नं. ३ समोर
न. चि. केळकर रोड, दादर, मुंबई ४०००२८

# हार्दिक शुभेच्छा !


सुरेल संगीत वाद्यांचे माहेरघर
हरिभाऊ
विश्वनाथ
कंपनी
दादर, मुंबई-२८. टे.नं. ४५२५४२
Shelke-Indulkar

# हार्दिक शुभेच्छा !



नेत्रतज्ञाकडून डोळे मोफत तपासले जातात.

वेळ : सकाळी ९ ते १२ • सायं. ४ ते ८.

## दादर ऑप्टिकल कं.

सायंटिफिक ऑप्टिशिअन्स

रा. ब. सी. के. बोले मार्ग, पिंटो व्हिला हायस्कूल समोर,
दादर, मुंबई ४०००२८. सोमवार बंद.

**फोन - ४६ ५१ ५६**